उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांचे कार्यालय, रत्नागिरी
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जयस्तंभ रत्नागिरी. पिन नं. 415612**
दूरध्वनी क्रमांक 02352-222422 Email - sdoratnagiri@gmail.com


क्र.महसूल/भूसंपादन/24x7 तक्रार/2019 दिनांक 27-05-2019

प्रति.

श्री.अभिजीत जोशी,
रा.आरवली ता.संगमेश्वर
जि.रत्नागिरी

विषय - रत्नागिरी 24 X 7 पोर्टलवर केलेला तक्रार अर्ज...

महाशय

आपण रत्नागिरी 24 X 7 पोर्टलवर अर्ज करुन मा.अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडील आदेश क्रमांक NH66/अपिल क्रमांक 40/2017, संगणक क्रमांक 2017/00020 दिनांक 28-02-2018 नुसार दिलेल्या आदेशान्वये जमिनीचा मोबदला न मिळाल्याबाबत तक्रार केली आहे.

आपल्या तक्रार अर्जानुसार आपणांस कळविण्यात येते की, आपण मा.अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी तथा लवाद यांचे न्यायालयात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 च्या चौपदरीकरणातील मौजे आरवली येथील स.नं. 117अ1/19 मधील बांधकामाचे मुल्यांकनाची रक्कम मिळणेबाबत अपील अर्ज दाखल केला होता. मा.अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी त्यांचेकडील आदेश क्रमांक NH66/अपिल क्रमांक 40/2017, संगणक क्रमांक 2017/00020 दिनांक 28-02-2018 नुसार आपला अपील अर्ज मंजूर केला आहे. त्यानुसार आपल्या बाधित बांधकामाचे सार्वजनिक बांधकाम विभाग, देवरुख यांनी केलेले मुल्यांकन रक्कम रु. 10,70,137/- यानुसार परिगणना करुन सदरच्या मोबदल्याच्या रकमेची मागणी राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी यांचेकडे या कार्यालयाकडील पत्र क्रमांक उविअर/भूसं/रा.म.66/आरवली/पुरवणी निवाडी/40/2018, दिनांक 01-10-2018 नुसार करण्यात आली आहे. सदरची रक्कम राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी यांचेकडून अदयाप प्राप्त झालेली नाही. राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी यांचेकडून सदरची मोबदला रक्कम प्राप्त होताच आपणांस अदा केली जाईल, कृपया याची नोंद घ्यावी.

उपविभागीय अधिकारी
तथा सक्षम प्राधिकारी, भारतीय राष्ट्रीय
राजमार्ग प्राधिकरण रत्नागिरी

प्रत- मा.जिल्हाधिकारी रत्नागिरी (24x7 विभाग) यांजकडे माहितीसाठी सविनय सादर

f:\bhusampadan\other letter.docx